पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ९

**सभावृत्तांत**

दिनांक :- ०५ / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक ०५/०९/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. पांढरकर निलेश शंकरराव
३) मा. आसवानी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
४) मा. भालेकर शांतराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
५) मा. बोकड रामदास गेणभाऊ
६) मा. जयश्री वसंत गावडे
७) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा.माछरे - विशेष अधिकारी, मा. सहस्त्रभोजनी - प्र.उपनगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक :- २३ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०५/०९/२०१२ विभाग :- क्रिडा
सुचक :- मा. जयश्री गावडे अनुमोदक :- मा. हिरानंद आसवानी
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.क्रिडा/७/कावि/३८४/२०१२, दि. २९/०८/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निविदा नोटीस क्र. १/२००७-०८, क्र.क्रीडा/४अ/कावि/१८०/२००७ दि.१६/६/०७ अन्वये निविदा नोटीस प्रसिध्द करुन ५ वर्षाकरीता दरपत्रके मागविली असता मे. सुमित स्पोर्टस् ॲन्ड फिटनेस, इक्विपमेंटस्, चिंचवड, पुणे १९ यांना त्यांचे नावापुढे प्रस्तावात नमुद कामाच्या कालावधीचे नेहरुनगर, थेरगांव, भोसरी, चिंचवडगांव, मा.आयुक्त निवास, पिंपळे गुरव व यमुनानगर तलाव या ७ जलतरण तलावाचे व मे. वरदायिनी एन्टरप्राईझेस, चिंचवड, पुणे १९ यांना त्यांचे नावापुढे प्रस्तावात नमुद कामाच्या कालावधीचे निगडी प्राधिकरण, मोहननगर, सांगवी, व कासारवाडी तलाव या चार जलतरण तलावाचे पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाज

चौथ्या वर्षाच्या दराने पाचव्या वर्षाचे कामकाज करुन घेणेस मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**[ थोरात वनिता एकनाथ ]**
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/११५६/२०१२
दिनांक :- ०६/०९/२०१२ चे लगत

**प्र. उपनगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\१७२.१६.०.६८\e\e drive\Nagersachiv१\Krida ११-१२\Proceeding_८.doc